नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२८ Issue - 328 | वार रविवार दि. १९ एप्रिल २०२६ Blow- Sunday Date 19 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# महागाई भत्त्यात केंद्र सरकारकडून मोठी वाढ

## ५० लाख केंद्रीय कर्मचारी आणि ६९ लाख निवृत्तीवेतनधारकांना फायदा होणार; केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाली घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


नवी दिल्ली : सरकारने केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात (डीए) आणि महागाई सवलतीत (डीआर) २ टक्के वाढीस मंजुरी दिली आहे. सरकारने महागाई भत्ता ५८ वरून ६० टक्क्यांपर्यंत वाढवला आहे. ही वाढ१ जानेवारी २०२६ पासून लागू होईल. या निर्णयामुळे सरकारच्या वार्षिक खर्चात ₹६,७९१ कोटींची वाढ होईल. यापूर्वी, ऑक्टोबरमध्ये महागाई भत्ता ५५ वरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आला होता. मागील सुधारणा १ जुलै २०२५ पासून लागू झाली होती आणि ती थकबाकीसह देण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज (१८ एप्रिल) दिल्लीत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही घोषणा करण्यात आली. याचा फायदा अंदाजे ५०.५ लाख कर्मचारी आणि ६८.३ लाख निवृत्तीवेतनधारकांना होईल.

केंद्र सरकार वर्षातून दोनदा, जानेवारी आणि जुलैमध्ये महागाई भत्ता (डीए) आणि महागाई सवलतीत (डीआर) सुधारणा करते. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांच्या मासिक पगारात आणि निवृत्तीवेतनधारकांच्या पेन्शनमध्ये वाढ होते.

महागाई भत्ता (ऊ) म्हणजे काय आणि तो महत्त्वाचा का आहे?

महागाई भत्ता (ऊ) हा सरकारी कर्मचाऱ्यांना दिला जाणारा एक जीवनमान भत्ता आहे. त्याची गणना मूळ वेतनाच्या टक्केवारीनुसार केली जाते.

वाढत्या किमतींच्या काळात कर्मचाऱ्यांच्या वास्तविक उत्पन्नाचे संरक्षण करणे आणि त्यांचे वेतन महागाईच्या बरोबरीने राहील याची खात्री करणे, हा त्याचा मुख्य उद्देश आहे.



आठव्या वेतन आयोगाअंतर्गत मूळ वेतन ₹६९,००० पर्यंत वाढवण्याची मागणी

हा निर्णय अशा वेळी आला आहे, जेव्हा कर्मचारी संघटना आठव्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन रचनेत मोठ्या बदलांची मागणी करत आहेत. नॅशनल कौन्सिल-जॉइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी (छउ-गउच्) ने आपल्या निवेदनात ३.८३ च्या उच्च फिटमेंट फॅक्टरची मागणी केली आहे.

जर ही मागणी मान्य झाली, तर किमान मूळ वेतन ₹१८,००० वरून अंदाजे ₹६९,००० पर्यंत वाढू शकते. वेतनाच्या गणनेसाठी कुटुंबाच्या व्याख्येत अवलंबून असलेल्या पालकांचा समावेश करावा आणि वेतनातील तफावत दूर करावी, असेही या संघटनेने सुचवले आहे.

आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीची कालमर्यादा अद्याप जाहीर झाली नसली तरी, त्याची अंमलबजावणी लवकरच होऊ शकते अशी जोरदार चर्चा आहे. तथापि, त्याच्या पूर्ण अंमलबजावणीसाठी २०२८ पर्यंत वेळ लागू शकतो.

आठवा वेतन आयोग लागू होईपर्यंत महागाई भत्त्याचे (ऊ) काय होईल?

नवीन वेतन आयोग लागू होईपर्यंत महागाई भत्ता मूळ वेतनाच्या टक्केवारीनुसार मोजला जाईल. त्यात दर सहा महिन्यांनी, जानेवारी आणि जुलैमध्ये सुधारणा केली जाते.

याचा अर्थ असा की, आठवा वेतन आयोग लागू होईपर्यंत महागाई भत्ता दिला जाईल. आयोगाच्या अंमलबजावणीनंतर, सध्याचा महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन केला जाईल. याचा अर्थ असा की, सध्याचा ५८ टक्के महागाई भत्ता शून्य होईल.

पगार, निवृत्तीवेतन आणि भत्त्यांमध्ये सुधारणा केली जाईल

आठव्या केंद्रीय वेतन आयोगाचा उद्देश केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार, निवृत्तीवेतन आणि भत्त्यांमध्ये सुधारणा करणे हा आहे. यामध्ये महागाई, कर्मचाऱ्यांच्या गरजा आणि सरकारची आर्थिक क्षमता विचारात घेतली जाईल.

केंद्र सरकारने २८ ऑक्टोबर २०२५ रोजी आठव्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेला (ढशीों ेष ठशषशीशपलश) मंजुरी दिली. आता, आयोगाच्या स्थापनेनंतर, तो १८ महिन्यांच्या आत आपल्या शिफारसी सादर करेल.

आठव्या वेतन आयोगाच्या वेतन गणनेबद्दल जाणून घ्या

मूळ वेतनातील वाढ ही फिटमेंट फॅक्टर आणि महागाई भत्त्याच्या (ऊ) विलीनीकरणावर अवलंबून असते. सातव्या वेतन आयोगामध्ये फिटमेंट फॅक्टर २.५७ होता. आठव्या आयोगामध्ये तो ३.८३ असू शकतो.

प्रत्येक वेतन आयोगामध्ये महागाई भत्ता (ऊ) शून्यापासून सुरू होतो. याचे कारण असे की, महागाईचा विचार करून नवीन मूळ वेतनात आधीच वाढ केलेली असते. यानंतर, महागाई भत्ता पुन्हा हळूहळू वाढतो.

सध्या, महागाई भत्ता (ऊ) मूळ वेतनाच्या ६० टक्के आहे. महागाई भत्ता (ऊ) काढून टाकल्यामुळे, एकूण वेतनातील (मूळ वेतन + महागाई भत्ता + घरभाडे भत्ता) वाढ किंचित कमी दिसू शकते, कारण ६० टक्के महागाई भत्त्याचा घटक काढून टाकला जाईल

# वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी एआयचा वापर करा; मुख्यमंत्र्यांचे ऊर्जा विभागाला निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ऊर्जा विभागाला महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. वीजनिर्मिती व वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ताचा प्रभावी वापर करण्यावर भर द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या आढावा बैठकीत ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी टाटा पॉवर, अदाणी पॉवर आणि बेस्ट संस्थांचे प्रतिनिधीही सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, उन्हाळा आणि आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहणे आवश्यक आहे. देखभाल, दुरुस्ती आणि व्यवस्थापनाच्या कामांमध्ये एआयचा वापर करून कार्यक्षमता वाढवावी, असे त्यांनी निर्देशित केले.



ऊर्जा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात आवश्यक वीजनिर्मितीसाठी पुरेसा कोळसा व पाण्याचा साठा उपलब्ध आहे. तसेच रूफटॉप सौर ऊर्जेमुळेही वीज उत्पादनात भर पडत आहे. मॉन्सूनपूर्व देखभाल आणि दुरुस्तीची कामेही वेगाने सुरू असल्याचे सांगण्यात आले.

गरज भासल्यास कोयना जलविद्युत प्रकल्प १८०० मेगावॅटपर्यंत पूर्ण क्षमतेने वापरण्याची तयारी ठेवण्यात आली आहे. आपत्कालीन परिस्थितीत अतिरिक्त वीज खरेदीचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

मुंबईसाठी 'आयलँडिंग प्रणाली' कार्यरत असून, ग्रीडमध्ये बिघाड झाल्यास मुंबईला स्वतंत्रपणे वीजपुरवठा करण्याची क्षमता या यंत्रणेत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वीज खंडित होण्यापासून संरक्षण मिळते.

एमएमआर क्षेत्रातील प्रसारण प्रणाली मजबूत करण्याचे काम सुरू असून भिरा पंप्ड स्टोरेज प्रकल्प कार्यरत आहे. तसेच सर्व ब्लॅक स्टार्ट ड्रिल्स आणि राज्य लोड डिस्पॅच केंद्रच्या बॅकअप कंट्रोल ड्रिल यशस्वीरीत्या पूर्ण झाल्या आहेत, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीतही वीजपुरवठा सुरळीत ठेवता येणार आहे.

# काँग्रेसने महिलांच्या अधिकाराची भ्रूणहत्या केली, स्वप्नांचा चक्काचूर केला, त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागणार; नरेंद्र मोदींची टीका

नवी दिल्ली : काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांचे भ्रूणहत्या केली. ज्या ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणले त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. या पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करत त्यांचा खरा चेहरा समोर आणला असंही नरेंद्र मोदी म्हणाले.

महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली असं नरेंद्र मोदी म्हणाले.

नरेंद्र मोदी म्हणाले की, आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी ६० टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहतोय. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला असं नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करूच.



भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आलं, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठं होतं. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झालं. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असंच घडलं.

देशातील कोट्यवधी महिला संसदेकडे डोळे लावून बसल्या होत्या. ज्यावेळी महिलांच्या हितासंबंधी संसदेत प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांच्या अधिकारांवर गदा आली त्यावेळी काँग्रेस सारख्या परिवारवादी पक्ष टाळ्या वाजवत होते.

ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे.

नारीशक्ती वंदन बिल हे प्रत्येकाला काहीतरी देणारं होतं, कुणाचेही काहीही काढून घेणारं नव्हतं. गेल्या ४० वर्षांपासून प्रलिंबित असलेलं ते बिल होतं. या माध्यमातून एकविसाव्या शतकातील महिलांना नवीन संधी देणारे आणि त्यांच्या वाटेतील अडचणी दूर करणारे होते. देशातील अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देणारा तो प्रयत्न होता.

मतदारसंघ पुनर्रचनेमुळे महिलांची संख्या वाढणार होती

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे महिलांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु काँग्रेसला ते नको असल्याने त्याला विरोध केला. काँग्रेसने 'फोडा आणि राज्य करा' हे सूत्र इंग्रजांपासून घेतलं आणि त्याचाच वापर त्यांनी यावेळी केला.

मतदारसंघ पुनर्रचनेवर काँग्रेस आणि टीएमसी, डीएमके, समाजवादी पक्षाने सातत्याने अफवा पसरवल्या. या विधेयकाच्या माध्यमातून सर्व राज्यांच्या संसदेतील प्रतिनिधित्वामध्ये समान वाढ होणार होती. परंतु, विरोधकांच्या विरोधामुळे हे होऊ शकलं नाही.

## वारकरी संघटनांची पंढरपूर येथे बैठक

# वारकरी संप्रदायाच्या वतीने लवांडेंच्या अटकेची मागणी!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :

आज पंढरपूर येथे पंढरपूरातीलवारकरीसंप्रदायातील सर्व फडकरी, मठाधिपती,दिंडीमालक, संस्थानिक, पंढरपूर मधील वारकरी संप्रदायावर प्रेम करणारे स्थानिक नागरिक यांची एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत संतांचे वंशज यांसह संप्रदायातील समस्त वारकरी फडकरी समाज संघटना, वारकरी संप्रदाय पाईक संघ, विश्व वारकरी संघ,विश्व वारकरी सेना , अखिल वारकरी भाविक मंडळ इ.संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नुकतेच राष्ट्रवादी पक्ष (श.प.) गटप्रमुख शरद पवार यांनी केलेले वारकरी संप्रदायात प्रतिगामी लोकांची घुसखोरी झाली असल्या विषयक वादग्रस्त लेखन,त्या पाठोपाठ पक्षाचे प्रवक्ते विकास लवांडे यांनी संप्रदायात पुज्यस्थानी असणाऱ्या मान्यवर महाराज मंडळींची नावे जाहीर केली होती. या घटनांमुळे वारकरी संप्रदायात अत्यंत संतापाची लाट उसळलेली आहे. संप्रदायाच्या सर्व स्तरातून तर निषेध होतोच आहे.मात्र संप्रदायावर अकृत्रिम प्रेम करणारा लाखोंचा सर्वसामान्य समाज वारकरी संप्रदायाला निष्कारण राजकिय पक्ष लक्ष्य करत असल्याचे पाहून क्रोधाविष्ट झाला आहे. ज्या वीस महाराज मंडळींची नावे घुसखोर म्हणून जाहिर केली आहेत.ते लोक म्हणजे ज्यांनी ज्ञानोबा तुकोबारायादी संतांच्या पश्चात हा वारकरी संप्रदाय जतन आणि संवर्धित केला अशा शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या दिव्य परांपरांचे जेष्ठ अधिकारी मंडळी आहेत. यात प्रामुख्याने बंडा तात्या कराडकर हे संप्रदायातील जेष्ठ वारकरी ज्यांनी वारकरी म्हणून सर्वोच्च सेवेचा मापदंड तर केलाच आहे...पण जगद्गुरु तुकोबारायांची तपोभूमी भंडारा डोंगर वाचवण्यासाठी 'डाऊ' सारखी विषारी वायू उत्पन्न करणारी कंपनी जाळून लाखो जणांचे प्राणच जणू वाचवले होते. देगलूरकर घराण्याने चातुर्मासात पंढरपूरची सिमारेषा ओलांढायची नाही यासाठी आपल्या तत्कालीन वतनांवर पाणी सोडलेले आहे

> **राजकारणी लोकांना आम्ही राजकारण कसे करावे हा सल्ला देत नाही त्यांनी आम्हाला संप्रदाय कसा चालवायचा शिकवू नये. संप्रदाय हिंदू धर्मातील एक सर्वात विकसीत उपासना पंथ आहे.संप्रदायाला निधर्मी ठरवण्याचा प्रयत्न कशाला ? संप्रदायामुळे जातीयभिंती नष्ट होऊन समाज धर्ममार्गाने एकत्र येतो तेव्हा जातीयवादी राजकारण करणाऱ्या पक्षांना याचा मोठा अडसर निर्माण होतो हिच यांची पोटदुखी. मोठ्या पक्षांशी लढण्याची ताकद नाही म्हणून वारकरी संप्रदायाला लक्ष्य.**

स्वतः चंद्रशेखर महाराज हे आपल्या प्रकांड विद्वत्तेने सकल वारकऱ्यांच्या हृदयस्थानी विराजमान आहेत. वासकर महाराज हे त्या परंपरेचे गादीप्रमुख आहेत ज्या ब्रह्मलीन मल्लाप्पा वासकरांनी श्रीमंत सरदार महादजी शिंदे यांना वारकरी संप्रदायाची दीक्षा दिली, पाचपेर महाराज यांचे गोरक्षणाचे कार्य अद्वितीय आहे... अशा प्रत्येकच महाराज मंडळींच्या कार्याचा आवाका मोठा आहे. यात अक्षय महाराज भोसले व आचार्य तुषार भोसले यांनी अनुक्रमे शिवसेना व भाजप या पक्षाचे आध्यात्मिक आघाडी असे व्यासपीठ निर्माण करुन त्या माध्यमातून वारकरी संप्रदायातील अडीअडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत या प्रयत्नांतूनच पंढरपूर साठी मा . मुख्यमंत्री यांनी एक हजार बेडचे रुग्णालय मंजूर केले आहे. तरीही या आघाडीच्या माध्यमातून कोणीही महाराज मंडळी राजकारणात उतरली नाहीत किंवा संप्रदाय कोणत्याही पक्षाच्या दावणीला बांधलेला नाही हे निर्विवाद सत्य आहे.

झालेल्या या प्रकारामुळे सर्व सामान्य वारकऱ्यांची अत्यंत संतापाची भुमिका असल्याचे लक्षात घेऊन आजची बैठक घेण्यात आली व यात लवांडे यांनी तात्काळ वारकरी संप्रदायाची माफी मागावी, ज्या पुजनीय संतांना घुसखोर म्हणून अवमानीत करण्याचा प्रयत्न केला त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून क्षमायाचना करावी. हे स्वतः लवांडे करत नसल्यास उद्या दुपारी पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करुन लवांडेच्या अटकेची मागणी केली जाणार आहे. वारकरी संप्रदायाच्या तीव्र भावना व कायदा सुव्यवस्थेचा निर्माण होऊ शकणारा प्रश्न लक्षात घेऊन शासनाने व प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन लवांडेना अटक करावी.

अन्यथा येत्या आठवड्यात पंढरपूर मध्ये एक भव्य दिव्य दिंडी मोर्चा चे आयोजन करण्यात येईल, गावोगावी अशा तक्रारी मोर्चे होतील, मानहाणीचा दावा दाखल होईल. वारकरी संप्रदायाचा विनाकारण दुस्वास करणारांना कायमचा धडा शिकवण्याचा विडा संप्रदायाने उचलला असून शासनाने महाराष्ट्र सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी व राष्ट्रवादी पक्ष (श.प.) गटाने आपली आणखी वाताहत होऊ नये यासाठी तात्काळ लवांडेवर कारवाई करावी अन्यथा वारकरी संप्रदायाच्या अद्भूत,अकल्पनीय, अविश्वसनीय रोषाला सामोरे जावे लागेल. या बैठकीत खालील महाराज मंडळी प्रातिनिधिक स्वरुपात उपस्थित होती.

सर्वश्री ह.भ.प.संजय महाराज देहूकर . डॉ.महेश महाराज देहूकर (जगद्गुरु तुकाराम महाराज वंशज )विठ्ठल महाराज नामदास ,निवृत्ती महाराज नामदास(संत नामदेव महाराज वंशज), भागवत महाराज शिरवळकर ,विठ्ठल स्वामी महाराज वडगांवकर, भागवत महाराज चवरे, विठ्ठल महाराज चवरे,रघुनाथ महाराज कबीर , नागेश महाराज बागडे ,रामकृष्ण महाराज वीर शाम महाराज उखळीकर ,विश्वनाथ महाराज राशीनकर ,हरि महाराज लबडे ,श्रीकांत महाराज हरिदास हृषीकेश महाराज उत्पात ,रमेश महाराज वाघ, आळंदी , ज्ञानेश्वर महाराज तारे ,योगेश महाराज पिंपळनेरकर ,पद्मनाभ महाराज देवडीकर ,माधव महाराज बडवे , नगरसेवक सौरभ थिटे पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते.

# पंढरपुरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त भव्य मिरवणूक

## पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते विविध जयंती मंडळाचे स्वागत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंतीनिमित्त पंढरपुरात शनिवारी भव्य मिरवणूक सोहळा उत्साहात पार पडला. या मिरवणुकीत हजारो भीमसैनिकांसह महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत जल्लोष साजरा केला. यावेळी मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने पंढरपूर येथील विविध जयंती मिरवणुकीचे स्वागत ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या मूल्यांवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या विचारांमुळे भारतीय समाजाला नवी दिशा मिळाली .त्यांनी लोकशाहीची पायाभरणी अधिक मजबूत केली. असल्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगून सर्व भीमसैनिकांना यावेळी शुभेच्छा दिल्या.

या मिरवणुकीत विद्युत रोषणाई व फुलांनी सजवलेल्या ट्रक, टेम्पो व रथांमध्ये डॉ.बाबासाहेब व गौतमबुद्ध यांच्या प्रतिमा ठेवल्या होत्या. ढोल-ताशा, फटाक्यांची आतिषबाजी तसेच पारंपारिक वाद्य यावर भीमसैनिक व महिलांनी नृत्य करत उत्सवाचा आनंद लुटला. जयभीमच्या घोषणांनी संपूर्ण शहर भारावून गेले होते. सायंकाळी सात वाजलेनंतर शहरातील विविध भागांतून मिरवणुकांना प्रारंभ झाला. मिरवणुकांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्ध यांच्या प्रेरणादायी मूर्ती, देखावे यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मिरवणूक मार्गावर विविध राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि मंडळांनी स्वागत मंच उभारून सहभागींचे जंगी स्वागत केले. मिरवणुकी दरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून चोख पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

यावेळी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पालकमंत्री श्री. गोरे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच मध्यवर्ती समितीच्या वतीने पालकमंत्री श्री.गोरे यांचा सन्मान समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे यांच्यावतीने करण्यात आला.

मिरवणूक स्वागत प्रसंगी पंचायत समिती सभापती शुभम आगवणे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, तहसीलदार सचिन लंगुटे,





मध्यवर्ती जयंती समितीचे अध्यक्ष अभिराज उबाळे, उपाध्यक्ष विशाल मांदळे, कार्याध्यक्ष महेश मोटे, नगरपरिषदेचे नगरसेवक यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते.

# महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन व जिल्ह्यात समता सैनिक दलाच्या जवानांकडून लाँगमार्च

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा धाराशिव दक्षिण अंतर्गत महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती पर्व सादर साजरे करण्यात आले. या दोन्ही महामानवांच्या जयंतीनिमित्त भारतीय बौद्ध महासभेच्या जिल्हाध्यक्षा राजश्रीताई कदम यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सकाळी धाराशिव शहरातून समता सैनिक दलाची प्रभात फेरी काढण्यात आली. प्रभात फेरीचा समारोप डॉ बाबासाहेब आंबेडकर अस्थि पुतळा येथे करून सामूहिक त्रिसरण पंचशील घेऊन भारतीय बौद्ध महासभा आणि समता सैनिक दलाच्या वतीने तमाम बौद्ध उपासकांनी अभिवादन केले.

याबाबत सविस्तरवर अशी की, भारतीय बौद्ध महासभा राज्य व केंद्रीय शाखेच्या आदेशाप्रमाणे भारतीय बहुत महासभा जिल्हा शाखा धाराशिव चे अंतर्गत एप्रिल पासून एप्रिल सायन्स संध्याकाळी सायंकाळी पर्यंत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. भीम नगर क्रांती चौक येथून समता सैनिक दलाच्या वतीने पतसं चलनाचे आयोजन भीम नगर क्रांती चौक येथे शहरातील मुख्य मार्गावरून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे समारोप करण्यात आला.तसेच यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे वरिष्ठ पदाधिकारी जिल्हाध्यक्ष राजश्रीताई कदम यांच्या प्रमुख मार्गदर्शकांबद्दल दर्शनाखाली समता सैनिक दलाचे जिल्हा उपाध्यक्ष शरद बागडे यांनी सैनिकांना ऑर्डर देऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना दिली. तर जिल्हा संघटक बाबासाहेब बनसोडे यांनी सामूहिक पंचशील घेऊन तमाम बौद्ध उपासकांसह बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन केले. तरी याच क्रांतिकारी प्रसंगी धाराशिव शहरातील मुक्ताई सामाजिक संघटनेचे अध्यक्ष सोमनाथ गायकवाड यांनी भारतीय बौद्ध महासभेच्या भरघोस असे दान देऊन सहकार्य केले.

यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा सरचिटणीस विजय अशोक बनसोडे, जिल्हा कोषाध्यक्ष मीनाताई लागडे,जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष शरद बागडे, मेजर अनिल सरतापे, डिव्हिजन ऑफिसर वैभव शिरसाठ, धाराशिव समता सैनिक दलाचे जिल्हा सचिव सचिन दीलपाक,जिल्हा संघटक बाबासाहेब बनसोडे जिल्हा कार्यालयीन सचिव किरण धाकतोडे, महिला उपाध्यक्ष शीलाताई चंदनशिवे जिल्हा संघटक सुधाकर गायकवाड, उमाजी गायकवाड, धनंजय वाघमारे, संतोष झेंडे, ता.उपाध्यक्ष धम्मपाल शिंगाडे, तुळजापूर तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर बनसोडे, सरचिटणीस समता सैनिक दल तुळजापूर तालुका उपाध्यक्ष कांचन चिमणे, सुमित शेरखाने, नंदू हावळे, बालाजी शितोळे, आनंद कांबळे, स्वराज जानराव सोमनाथ सरवदे, प्रतिक चंदनशिवे यांच्यासह तुळजापूर धाराशिव तालुक्यातून समता सैनिकांचे सैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना अध्यक्षपदी सिद्धराम जकापुरे, उपाध्यक्षपदी सिद्धराम चिणमगेरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :




अक्कलकोट : तालुक्यातल्या मैंदर्गी मुलांची प्राथमिक कन्नड शाळेच्या नवीन शाळा व्यवस्थापन समितीच्या पुढील दोन वर्षांसाठी अध्यक्षपदी सिद्धराम जाकापुरे यांची निवड झाली आणि उपाध्यक्षपदी सिद्धराम चिणमगेरी व इतर सदस्यांची निवड झाली.

शनिवारी सकाळी १० वाजता, मुख्याध्यापक श्रीशैला हडलगी यांनी शाळेत पालकांची सभा बोलावली होती. या सभेत ५० हून अधिक स्त्री-पुरुष सदस्य सहभागी झाले होते आणि समितीसाठी आवश्यक असलेल्या १६ सदस्यांची निवड कशी करायची? त्यांनी समिती स्थापन करण्याचा उद्देश आणि समितीची कार्ये समजावून सांगितली. प्रत्येक वर्गातून एक महिला आणि एक पुरुष सदस्य निवडण्यात आले. निवडलेल्या सदस्यांमधून, सिद्धराम जाकापुरे दुसऱ्यांदा आणि सिद्धराम चिणमगेरी उपाध्यक्ष म्हणून निवडले गेले. सर्वांनी टाळ्या वाजवून निवडणुकीचे स्वागत केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या.

मुख्याध्यापक श्रीशैला हडलगी यांनी निवडलेल्या पदाधिकारी सदस्यांना पुष्पहार घालून सत्कार केले. आणि शाळेच्या सर्वांगीण विकासात हातभार लावण्याचे आव्हान केले. निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की ते शाळेच्या विकासात सहकार्य करतील आणि मुलांच्या शिक्षणाचा दर्जा सुधारतील.

शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका सुशीला स्वामी, विजयकुमार गुंडद , शिक्षक शिवानंद गोगाव , राजश्री उप्पिन, संगीता राठोड, अश्विनी संबरगी, अंबारया उजनी आणि शाळेतील इतर शिक्षक उपस्थित होते.

**नवीन शाळा व्यवस्थापन समिती**

**सिद्धाराम जकापुरे अध्यक्ष, सिद्धाराम चिणमगेरी उपाध्यक्ष, परमेश्वर सलगर, शंकरलिंग हुग्गी, बसवराज फुलारी, रेखा चिक्कळी, चंद्रकांत बुरुड, कावेरी हसरमनी, लक्ष्मी मठपती, महानंदा फुलारी सदस्य.**

# सोलापूर येथील मुलांचे व मुलींच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वस्तीगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा उत्साहात संपन्न




**भटके विमुक्त विकास परिषदेचे महाराष्ट्राचे संघटक मंत्री श्री राहुल चव्हाण साहेब व विकास परिषदेचे महाराष्ट्र प्रदेशाचे अध्यक्ष श्री उद्धवराव काळे सर त्यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्ह्यामध्ये ओबीसी बॉईज हॉस्टेल व ओबीसी गर्ल्स हॉस्टेलमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरा करण्यात आला व त्या हॉस्टेलमध्ये वकृत्व स्पर्धा आयोजित देखील करण्यात आला.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : इतर मागास बहुजन कल्याण विभाग आणि भटके विमुक्त विकास परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर येथील मुलांचे व मुलींच्या शासकीय वस्तीगृहात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे उत्साहात आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. गणेश सोनटक्के (सहाय्यक संचालक) उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. निशांत परदेशी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी गृहपाल श्री. शशिकांत चव्हाण, हिरेमठ मॅडम, सचिन कांबळे, सुनिल पवार आणि संजय राठोड यांची मान्यवर उपस्थिती लाभली.

स्पर्धेचा मुख्य विषय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रनिर्मितीतील योगदान हा असून विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या संविधान निर्मिती, सामाजिक न्याय, शिक्षण प्रसार, समता आणि आधुनिक भारत उभारणीतल्या अमूल्य योगदानावर प्रभावी विचार मांडले.

स्पर्धेतमुलींच्यावस्तीगृहातील सहभागी विद्यार्थिनींमध्ये सानिका हणुमंत झाडगे, अनुराधा रविंद्र पाटील, वैशणवी वैजनाथ घोडके, श्रुती हणुमंत मेटकरी, प्रीती बबीराम केदार, श्रद्धा सोपान जाधव, नागमा संजय घोडके आणि आरती संतोष पवार यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

त्यानंतर मुलांच्या वस्तीगृहातील सहभागी विद्यार्थ्यांमध्ये बन्सीद्द बर्गडे, बसवराज बिराजदार, गणेश राठोड, राहुल पुजारी, राहुल चव्हाण आणि सुरेश धर्मशाले यांनी प्रभावी वक्तृत्व सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांकडून भारतीय संविधानाची प्रस्तावना सामूहिकरीत्या म्हणून घेण्यात आली, तसेच विद्यार्थी विकास शपथ देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संविधान मूल्यांविषयी आदर आणि राष्ट्रनिर्मितीची भावना अधिक दृढ झाली.

स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सहाय्यक संचालक मा. श्री. गणेश सोनटक्के साहेब यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, विचारप्रवर्तक आणि राष्ट्रनिर्मितीच्या मूल्यांना बळ देणारा ठरला.

# पत्रकार संतोष रणदिवे यांना आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर युवा पत्रकार राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठान जयंती महोत्सव समिती पंढरपूर यांच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दैनिक तरुण भारत संवाद चे पत्रकार संस्कृत रंधवे यांना विश्व भूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वतीने आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर युवा पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

पत्रकार संतोष रंधवे हे दैनिक तरुण भारत संवाद या वृत्तपत्रात पंढरपूर प्रतिनिधी म्हणून नऊ वर्षापासून कार्यरत आहेत शेतकरी वंचित , शोषित व पीडित लोकांवरील झालेल्या अन्याय ला लेखणीतून वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे यापूर्वी त्यांना कोविड योद्धा, समता गौरव युवा पुरस्कार आषाढी यात्रा उत्कृष्ट वार्तांकन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.


सदर पुरस्कार सोहळ्याचे विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पंढरपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक ( शिवतीर्थ) येथे संपन्न झाली यावेळी माजी मंत्री लक्ष्मीराव ढोबळे मंदिर समिती सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. सौ प्रणिता भालके, सभापती डॉक्टर शुभम आगवणे, मनसे नेते दिलीप धोत्रे, चेअरमन अनिल सावंत, प्राचार्य बीपी रोंगे जयंती समितीचे संस्थापक अध्यक्ष डी राज रोबोट अध्यक्ष श्रीकांत चंदनशिवे, नितीन काळे, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## नांदणी नागम्मा देवी यात्रेनिमित्त दोन दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील नांदणी येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी दिनांक १८ आणि १९ एप्रिल २०२६ रोजी श्री नागम्मा देशी यात्रामहोत्सव मोठ्या दिमाखात साजरा केला जाणार आहे, सोलापूरच नव्हे तर शेजारील कर्नाटक राज्यातून ही मोठ्या संख्येने भाविक येत असतात या दोन दिवसाच्या सोहळ्यात भक्ती संगीत, शक्ती आणि लोककलेचा त्रिवेणी संगम पाहायला मिळेल, शनिवारी १८ एप्रिल भक्तीचा जागर यात्रेच्या पहिल्या दिवशी पहाटे नऊ वाजता नागम्मा देवीला महाभिषेक घालून उत्सवाची सुरुवात होईल.

कलगीतुळ्यांची जुगलबंदी सकाळी दहा वाजता कलगीतुरा या पारंपारिक लोककलेचा कार्यक्रम होईल, मौलासाब मकानदार मनस्वीनाळ आणि आयप्पा पुजारी बेलीहाळ या दोन दिग्गज शहरांमध्ये माध्यमिक सवाल जवाबदांचा सामना रंगेल, कलगी म्हणजे शक्ती आणि तुरा म्हणजे शिव अशा दोन पक्षातील ही काव्यात्मक लढत प्रेक्षकांसाठी आकर्षणाचे केंद्र असेल, मिरवणूक आणि फटाक्यांची हातातबाजी सायंकाळी शिवप्रतिमेची आणि रात्री आठ वाजता पालखी व नंदी ध्वजाची भव्य मिरवणूक संपूर्ण गावातून काढण्यात येईल रात्री अकरा वाजता अग्नी प्रज्वलन सोहळ्यानंतर आभाळा रंगीबेरंगी फटाक्याची मोठी हाताची पाहिजे केली जाईल रविवारी १९ एप्रिल थरारक निधी आणि कुस्त्यांचा आखाडा,

दुसऱ्या दिवशी यात्रेचा उत्साह सीगेला पोहोचला, सकाळी दहा वाजता भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या 'अग्निप्रवेश' सोहळा पार पडेल, यात अनवाणी पायाने धगधगत्या कोळशावरून चालण्याची प्रथा असून, त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होईल सायंकाळी पाच वाजता प्रसिद्ध मल्लांच्या जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम होईल यासाठी नामवंत पैलवान उपस्थित राहणार असून विजेत्यांच्या आकर्षक बक्षीस दिली जातील.

यात्रेची सांगता रात्री दहा वाजता बाथरूम विधीत मन गोविंदा या विशेष नाटकाने होईल मंदिरे समितीचे पुजारी व रेवैया निरूप पक्ष स्वामी आणि समस्त नांदणी ग्रामस्थांनी यात्रेच्या यशस्वीतेसाठी तयारी केली आहे पिण्याचे पाणी दर्शन व्यवस्था आणि सुरक्षेसाठी विशेष स्वयंसेवक तैनात करण्यात आले आहेत तरी सर्व सद भक्तांनी या यात्रेला लाभ घ्यावा असे आव्हान पंच कमिटी आणि नांदणीचे सरपंच शिवानंद बंडे यांच्याकडून करण्यात आलेले आहे.

# अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर राज्यभर बालविवाह रोखण्यासाठी कडक उपाययोजना

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे निर्देश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अक्षय्य तृतीयेच्या या शुभमुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळ्यांचे आयोजन होत असल्याने बालविवाह रोखण्यासाठी राज्य प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत. आज झालेल्या राज्यस्तरीय दूरदर्शन प्रणालीद्वारे व्हिडीओ कॉन्फरासिंगद्वारे महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर यांनी ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत विविध यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील सर्व सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक आणि अंगणवाडी सेविका यांना गावामध्ये होणाऱ्या विवाहांपूर्वी मुलगा व मुलगी यांच्या वयाची खात्री करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषतः अक्षय्य तृतीयेच्या दिवशी होणाऱ्या विवाह सोहळ्यांवर लक्ष ठेवून बालविवाह होणार नाहीत यासाठी पोलीस विभाग व स्थानिक प्रशासनाला समन्वयाने काम करण्यास सांगितले आहे. तालुका व ग्रामस्तरावर विशेष पथके स्थापन करून देवस्थान, मंगल कार्यालये आणि इतर विवाहस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. बालविवाहाचे कोणतेही प्रकरण आढळल्यास तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, पोलीस व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन जिल्हानिहाय कृती आराखडे तयार केले जात आहेत. सर्व तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश आहेत. याशिवाय, विवाहाशी संबंधित सेवा देणारे जसे की मंगल कार्यालये, केटरर्स, प्रिंटिंग प्रेस, फोटोग्राफर, वाजंत्री तसेच धर्मगुरू यांनी मुलगा-मुलगी यांच्या वयाची खात्री केल्याशिवाय कोणतीही सेवा देऊ नये, अन्यथा त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होणार आहे. बालविवाहाविरोधात जनजागृती वाढवण्यासाठी गावोगावी दवंडी, पोस्टर मोहीम, विशेष ग्रामसभा, शाळांमध्ये पालक बैठक तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून प्रचार केला जाणार आहे. दरम्यान, नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, बालविवाहासंदर्भातील कोणतीही माहिती चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा डायल ११२ वर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, राज्यात बालविवाहास आळा घालण्यासाठी प्रशासनाने सुरू केलेल्या या मोहिमेला समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे आवाहन राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर यांनी यावेळी केले आहे.

# कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त पंढरपूर येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती व प्राध्यापक प्रबोधिनी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने जयंती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.






कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून झाली. यावेळी अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बलवंत, उपप्राचार्य डॉ. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. समाधान माने, उपप्राचार्य डॉ. सुशीलकुमार शिंदे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे, समारंभ समितीचे प्रमुख डॉ. दत्तात्रय डांगे, प्राध्यापक प्रबोधिनी समितीचे प्रमुख डॉ. उमेश साळुंखे, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातील लोकशाही मूल्ये या विषयावर डॉ. सुशीलकुमार शिंदे यांनी मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानात त्यांनी सांगितले की, आंबेडकरांनी सामाजिक समता, बंधुता, न्याय आणि स्वातंत्र्य या मूल्यांना सर्वोच्च महत्त्व दिले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. तसेच आंबेडकरांनी राज्य हे मानवकेंद्रित असावे, ते न्याय व कल्याणासाठी वापरले जावे, असा मूलभूत विचार मांडला.

डॉ. शिंदे यांनी पुढे स्पष्ट केले की, काळाराम मंदिर सत्याग्रह व चवदार तळे सत्याग्रह या आंदोलनांतून सामाजिक समतेचा लढा अधिक बळकट झाला. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत आंबेडकरांनी समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तत्त्वांची प्रभावी मांडणी केली. स्त्री-पुरुष समानतेसाठी त्यांनी हिंदू कोड बिलाद्वारे महत्त्वपूर्ण प्रयत्न केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. बाळासाहेब बलवंत यांनी आंबेडकरांच्या विचारांची आजच्या पिढीसाठी असलेली गरज अधोरेखित केली. पश्चिम महाराष्ट्राला महात्मा फुले, छत्रपती राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांची समृद्ध विचारपरंपरा लाभली असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. उमेश साळुंखे यांनी केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जयपाल आणणापा काणे यांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी निवड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील भारतीय जनता पार्टीचे टाकळीवाडी शाखाप्रमुख तसेच जैन प्रकोष्ट कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष जयपाल अण्णाप्पा काणे यांची विशेष कार्यकारी अधिकारी पदी निवड

भारतीय जनता पार्टीचे कट्टर समर्थक म्हणून त्यांची ओळख आहे.

सर्वप्रथम गावामध्ये सन १९९० मध्ये भारतीय जनता पार्टी शाखा गावामध्ये आणली. एकनिष्ठ पक्षाशी राहिल्याने त्यांना विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांची निवड करण्यात आली.

# लासलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर; नागरिकांसाठी महसूल सेवा एका छताखाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : लासलगाव येथे महसूल विभागामार्फत 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' अंतर्गत नागरिकांना तात्काळ सेवा देण्याच्या उद्देशाने शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० वाजता ग्रामपंचायत कार्यालय प्रांगण, लासलगाव येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन निफाडचे तहसिलदार मा.विशाल नाईकवाडे, लासलगाव मंडळ अधिकारी रूपाली सावळे यांनी केले आहे.

या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री छगनराव भुजबळ, खासदार भास्करराव भगरे, आ.नरेंद्रजी दराडे, आ.किशोरजी दराडे, नाफेडचे माजी संचालक नानासाहेब पाटील, बाजार समिती सभापती ज्ञानेश्वर जगताप, माजी आमदार कल्याणराव पाटील तसेच मुंबई बाजार समिती संचालक जयदत्त होळकर उपस्थित राहणार आहेत. शिबिरासाठी मार्गदर्शक म्हणून उपविभागीय अधिकारी डॉ.शशिकांत मंगरुळे (निफाड) हे उपस्थित राहणार असून लासलगाव महसूल मंडळातील ग्राम महसूल अधिकारी प्रियांका वाघ (लासलगाव), लक्ष्मीकांत शिंदे (टाकळी विंचुर), जनार्दन उशीर (खडकमाळेगाव), ईश्वरी देशमुख (पिंपळगाव नजिक) व सुप्रिया माळोदे (वनसगाव) यांच्यासह मंडळातील सर्व सरपंच, पोलिस पाटील, ग्राम पंचायत अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, बी.एल.ओ. अधिकारी, महसूल सेवक, रेशन दुकानदार तसेच सेतु कार्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या सोडविणार आहेत. त्यामुळे लासलगाव मंडळातील टाकळी विंचुर, कोटमगाव, खडक माळेगाव, साराळे खुर्द, खानगाव नजिक, पिंपळगाव नजिक, वेळापुर, वनसगाव, ब्राह्मणगाव वनस, थेटाळे, निमगाव वाकडा, पाचोरे बु., पाचोरे खुर्द, ब्राह्मणगाव विंचुर, शिवापुर आदी गावांतील नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महसूल विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

या उपक्रमामुळे महसूल विभागाच्या विविध योजनांबाबत जनजागृती होऊन नागरिकांना जलद व प्रभावी सेवा मिळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे

■ या शिबिरात महसूल विभागामार्फत शासन निर्णयानुसार भोगवटादार वर्ग २ मधून वर्ग १ करण्यात आलेल्या जमिनींचे दुरुस्त सातबारा वाटप, जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत नोंदी घेणे, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांना आवश्यक दाखले वितरण,




सर्वांसाठी घर योजनेअंतर्गत पट्टे वाटप, अभिलेख दुरुस्ती हेल्पडेस्क, सातबारा वरील चुका दुरुस्ती व तात्काळ सुधारित सातबारा वितरण, तुकडेबंदी कायद्यांचे उल्लंघन करून झालेल्या अकृषिक हस्तांतरणाच्या नोंदी, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत मान्यता आदेश वितरण, सातबारा वरील वर्ग १ पोटखराबा क्षेत्राचे लागवडीयोग्य क्षेत्रात रूपांतर, प्रलंबित फेरफारांची निर्गती, लोकसेवा हक्क कायद्याअंतर्गत प्रमाणपत्रांचे तात्काळ वितरण, ई-मोजणी, ग्रीस्टॅक व पी.एम किसान तक्रार निवारण यांसारख्या सेवा देखील देण्यात येणार आहेत.

**महिलांचा सामाजिक संदेश : एकात्मिक सलोखा व शेजारधर्म पाळला**

# ग्रामीण-शहरी भागातील महिलांना पारंपरिक वाळवणाची भूरळ आजही कायम!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुन्नाभाई नंदागवळी/बाराभाटी :

उन्हाळ्या लागला की पावसाळ्यात भाजी आणि काही खुसखुशीत खाण्याची इच्छा तृप्त करावी लागते. त्यामुळे ग्रामीण भागापासून तर शहरी भागातही पळसाच्या पानावरील पारंपारिक पद्धतीने वाळवणाचे पदार्थ तयार केले जातात. सामाजिक एकता जोपासून शेजारधर्म पाळत सहकार्य करतात. म्हणून ही वाळवणाची पारंपारिक पद्धत आजही तीतकीच महत्त्वाची ठरतांना दिसते. यामधून सामाजिक संदेश दिला जातो.ग्रामीण-शहरी भागातील महिलांना पारंपरिक वाळवणाची भूरळ आजही कायम....! वास्तव नाकारता येत नाही.



त्यात प्रामुख्याने गावातील किवा लहान मोठ्या शहरातील महिला ह्या उळद, मुंग, लाखोरी, चना, वाटावा, या द्वीदल धान्यांच्या नख वळ्या मोठ्या आनंदाने टाकल्या जातात. तसेच पानावरील, अधानावरील व लाटणिचे पापड तयार करतात. तसेच लाल पिवळी हिरवी अशा रंगीबेरंगी रंगांच्या कुरड्या, शेवी असे पदार्थ तयार करतांना राजर्षी शाहू नगर अर्जुनीमोरगाव येथील महिला मंडळ यांनी संगम नंदागवळी यांच्या घरी सदर प्रयोग करण्यात आला.

सामाजिक सलोखा राखून एकात्मता नावाची ताकद दाखवून दिली. तसेच यापासून शेजारधर्म पाळत सहकार्य करतात. यावेळी चर्चांना उधान येते. गावातील शहरातील म्हाता-या महिला ह्या ख-या गाव कुसातील बातम्यांच्या जणू संपादकच असतात. एकत्र आल्या की त्यांच्या बातम्यांना सुरुवात केली जाते. ह्या चर्चातून कधी गालावर हास्य फूलतो. तर कधी मनाचा बोलतात. काही बातम्यांचे कथानक तर डोळ्यात पाणी आणणारे असतात. असे काही सुखद तर काही दुखद अनूभव याठिकाणी पहायला मिळतात.

पारंपरिक वाळवणाची एक वेगळीच गोष्ट तयार होते. जी सामाजिक संदेश देणारे प्रसंग तयार करते. एकत्र महिला येवून संविधानिक मुल्य जोपासून एकता, समता व बंधूभाव जोपासला जातो. तर शेजारधर्म हा सुध्दा सामाजिक बांधिलकी घट्ट करत असते.

वाळवणासाठी पळसाची पाने, मोहफुलांची पाने, केळीची पाने तसेच रोवणीच्यावेळी उपयोगी असणारे प्लास्टिक पिशव्या यांचाही बराच वापर केला जातो. तर बॅनर सुध्दा वापरतात. दोरीवर शेवी वाळवली जाते. अशाप्रकारे वाळवण तयार होताना गावात शहरात पाहायला मिळतात.

## वागदरी येथे माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के. गायकवाड : महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियाना अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे दि.१८एप्रिल २२६ रोजी आरोग्य तपासणी शिबिर घेऊन या अभियानाबद्दल माहिती देण्यात आली.



महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिनांक १८फेब्रुवारी २२६ रोजी माझं गाव आरोग्य संपन्न गाव या महत्त्वकांक्षी अभियानाचा शासन निर्णय प्रसिध्द केला असून दि.०१ एप्रिल २२६ पासून या अभियानाला राज्यभरात सुरुवात झाली आहे.

दि.१ ते ३० एपिल २२६ दरम्यान शासनाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळावर या अभियानात सहभागी होत असल्याची नोंद त्या त्या ग्राम पंचायतीने करावयाची आहे. या अभियानात जिल्हा स्तरावर विभागीय स्तरावर राज्यस्तरावर प्रथम द्वितीय आणि तृतीय येणाऱ्या ग्रामपंचायतींना रोख रक्कम पारितोषिक म्हणून दिले जाणार आहे.

त्याचाच भाग म्हणून तुळजापूर तालुक्यातील वागदरी या ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करून या अभियानात सहभागी होण्याच्या दृष्टीने सकारात्मक चर्चा करण्यात आली असून या प्रसंगी या अभियाना विषयी जनजागृती करण्यासाठी गावात ग्रामसभा घेणे, भितीपत्रके पोस्टर्स लावणे, भिंती रंगविणे, ग्रामस्तरावर सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक प्रतिनिधी, अशा कार्यकर्ती, अंगणवाडी कार्यकर्ती, आदीना सहभागी करून घेऊन एक समिती गठीत करणे असी सविस्तर माहिती डॉ.यशवंत नरवडे यांनी ग्रामस्थाना दिली.

या आरोग्य तपासणी शिबिरात येथील महिला ग्रामस्थ युवा कार्यकर्ते यांची रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी व अन्य इतर आजाराबद्दल ची प्राथमिक तपासणी करून प्रथमोपचार करण्यात आला.

यावेळी डॉ.यशवंत नरवडे, आरोग्य सेवक रजूबअली हावलदार, अशा कार्यकर्ती पार्वतीबाई बिराजदार यांनी आरोग्य तपासणीचे काम पाहिले व गरजूंना प्रथमोपचार म्हणून औषध गोळ्या देण्यात आल्या. या प्रसंगी रोजगार सेवक रामसिंग परिहार, नामदेव यादव, किशोर धुमाळ, एस.के. गायकवाड, मोहन धुमाळ ग्रा.प.सदस्या सुरेखाताई यादव, शिलाबाई बिराजदार सह ग्रामस्थ, महिला, युवक उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची थकीत ऊस बिले तातडीने जमा करा

## अक्कलकोटमध्ये 'अनुभूती प्रकल्पा'चा भूमिपूजन सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेअरमन च्या घरासमोर हलगीनाद आंदोलन करण्याचा स्वाभिमानीचा इशारा

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याकडे २०२५-२०२६ मध्ये पंढरपूर,माढा ,मोहोळ, माळशिरस तालुक्यातील ऊस गाळपासाठी आला असून हंगाम संपून ३ते ४ महिने उलटून गेले तरी कारखाना प्रशासनाने उद्या ऊस बिल शेतकर्यांना दिली नसून एप आर पी च्या कायद्याची अंमलबजावणी न करता शेतकऱ्यांना वेठीस धरले आहे.

कायद्यानुसार एप आर पी ची रक्कम शेतकऱ्यांना १५ दिवसांत न दिल्यास १५% टक्क्यांनी पैसे शेतकऱ्यांना द्यायचा असताना आपण कायदा मोडला असून आपल्या कारखान्यावर आर.आर.सी ची कार्यवाही होऊ शकते. पाठीमागे ३५०० रुपये ऊस दर जाहीर करून शेतकऱ्यांची चेष्टा केली, जिल्हा परिषद पंचायत समिती च्या निवडणुकीत जाहीर केलेले १०० रुपये तातडीने जाहीर करावे, या वर्षी शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून युद्धामुळे शेतकऱ्यांच्या कुठल्याच शेती मालाला भाव न मिळाल्याने शेतकरी निराश असून आपण ८ दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बिल जमा करावे अन्यथा आपल्या संस्थेच्या चेअरमन च्या घरासमोर हलगीनाद आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे निवेदन कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री गायकवाड यांच्या कडे दिले आहे यावेळी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष श्री सचिन आटकळे,संग्राम ढाणे पाटील, पार्थ सुरवसे, नवनाथ मोहिते, नामदेव पवार लक्ष्मण नागटिळक, बाळासाहेब कोरके, बाळासाहेब जमदाडे आदि शेतकरी उपस्थित होते.

निवडणुकीच्या काळात शेतकऱ्यांना दिलेला शब्द पाळला नाही, युद्धामुळे शेतकरी अडचणीत आहे , शेतकरी संघटनेला आंदोलन करण्याची वेळ येऊ देणार नाही म्हणाले होते परंतु उडवाउडवीची उत्तरे देत आहे,८ दिवसात पैसे जमा करा अन्यथा चेअरमन च्या घरासमोर हलगीनाद आंदोलन केले जाणार आहे.

**सचिन आटकळे (जिल्हा कार्याध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना)**



## श्री स्वामी समर्थांची सुलभ दर्शनाची नियोजन म्हणजे भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान-ब्रह्मषी बनारस बाबू गुरुजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर/प्रतिनिधी : मंदिर समितीच्या सेवाभावी सेवेच्या माध्यमातून तथा श्री स्वामी समर्थांच्या सुलभ दर्शन येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात आम्हाला लाभलेल्या सुलभ स्वामी दर्शनाची आम्ही गहिवरलो आहे. उच्च, नीच, गरीब, श्रीमंत, असा भेदभाव अत्यंत जलद गतीने स्वरूप स्वामी दर्शनाचा लाभ करून देत असल्याने मंदिर समितीचे स्वामी समर्थांचे सुलभ दर्शन व्यवस्थेची नियोजन म्हणजे भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान असल्याचे मनोगत हैदराबादीतील प्रसिद्ध श्री जगदंबा तीन शक्ती पिठाची पिठाधिपती ब्रह्मषी बनारस बच्चू गुरुजी यांनी व्यक्त केले.

हे नुकताच येतील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिराचा भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिराचे चेअरमन महेश इंगळे यांनी ब्रह्मषी बनारस बाबू गुरुजी यांचा श्री स्वामी समर्था चे कृपा वस्त्र प्रसाद प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी महर्षी बनारस बाबू गुरुजी बोलत होते.

पुढे बोलताना ब्रह्मषी बनारस बाबू गुरुजी यांनी हैदराबाद मधील विविध भागांमध्ये अनेक स्वामी समर्थांची भक्ती पाहून स्वामींच्या दर्शनाकरिता येथे येण्याची प्रेरणा लाभली यामुळेच आज येथे आल्यानंतर मंदिर समितीच्या सहकार्याने व महेश इंगळे यांच्या आधारित त्याने सुलभ स्वामी समर्थांचे लाभ घेत असल्याने मंदिर समितीचे आपण शतशः ऋणी असल्याचे मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाडगे, महेश गुंगी, प्राध्यापक शिवशरण अचलेर, लेखपाल ओंकार, उडगे श्रीकांत मालवे, अविनाश सुरवसे विपुल जाधव सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

## निफाडमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि गौरवपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांचे नेटके नियोजन समितीच्या वतीने करण्यात आले होते.

सकाळी ठीक १० वाजता निफाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती स्मारकास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजय चंद्रकांत खंडाळे व उपाध्यक्ष जय रमेश खडताळे खजिनदार सचिन विजयकांत खडताळे, विकास शरद खडताळे, सहखजिदर उज्वल सुरेश खडताळे, हर्षल संजय जगताप कार्याध्यक्ष ऋषिकेश साळवे , राहुल अहिरे, निरज भालेराव सचिव कुणाल खडताळे, रक्षित खडताळे, दुर्गेश वाघ, सहसचिव करण केदार, अभिषेक निषाद यांच्या हस्ते मुख्य पुजा व पुष्पहार अर्पण सोहळा पार पडला.

याप्रसंगी प्रशासकीय अधिकाऱ्यांनीही उपस्थित राहून महामानवास अभिवादन केले. निफाड पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक गणेश गुरव अधिकारी व कर्मचारी, होमगार्ड पथक, तसेच निफाड नगरपंचायतीचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष अनिल कुंदे नगरसेवक सुनील निकाळे, सागर कुंदे, देवदत्त कापसे, साहेबराव बर्डे, मुख्याधिकारी चौधरी व कर्मचारी यांनी स्मारकास पुष्पहार अर्पण केला. तसेच निफाड तहसीलदार कार्यालयातील तहसीलदार विशाल नाईकवाडे व त्यांच्या सर्व कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून आदरांजली वाहिली.

जयंतीच्या निमित्ताने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण होते. प्रशासकीय यंत्रणा, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिक मोठ्या संख्येने या सोहळ्यात सहभागी झाले होते. उत्सवाचे उत्तम नियोजन केल्याबद्दल नागरिकांनी जयंती उत्सव समितीचे कौतुक केले.

## सलगरा (मड्डी) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची भव्य मिरवणुकीने सांगता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के.गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील सलगरा मड्डी येथे महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंती मोठ्या उत्साहाने व विविध उपक्रमाने साजरी करण्यात आली असून दिनांक १६ एप्रिल रोजी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढून या जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब . आंबेडकर जयंती उत्सव कमिटी सलगरा मड्डी च्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक १५ एप्रिल रोजी सायंकाळी ठिक .७.०० वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना करून संघमित्र गायन कलापथक हडपसर पुणे यांच्या समाज प्रबोधनपर भिम गीत गायनाच्या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.या प्रसंगी संघमित्र गायन कलापथकाचे प्रदीप वाघमारे, दयानंद गायकवाड, चंद्रकांत शिंदे, प्रेमचंद कांबळे, किरण कांबळे,अतुल वाघमारे, अंबादास वाघमारे, गणेश बनसोडे,निलेश वाघमारे,आदी कलावंतांनी समाजप्रबोधनपर अर्थपूर्ण भिम गीते सादर करून उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.

तर दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी दहा वाजता दरम्यान येथील भीम नगर येथून भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची सहवाद्य लेझीम पथकासह गावातील मुख्य रस्त्यावरून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी भीम सेना लेझीम पथक नंदगाव, धम्मदीप लेझीम संघ अचलेर, कमलशील लेझीम पथक हंगरगा नळ, भीम टायगर लेझीम पथक भुरीकवठा आधी लेझीम पथकाने गावातील मुख्य चौका चौकात आपल्या लेझीम पथकाचा उत्कृष्ट खेळाचे सादरीकरण केले.



या सर्व कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीचे दिगंबर वाघमारे, दीपक वाघमारे, अण्णाप्पा वाघमारे, सुदर्शन वाघमारे, मीनाक्षी वाघमारे, तात्याराव वाघमारे, चंद्रकांत वाघमारे, गुंडू वाघमारे, गजेंद्र वाघमारे, भालचंद्र वाघमारे, गोरख वाघमारे,विजय गायकवाड, शुक्राचार्य वाघमारे, भरत वाघमारे, सतीश वाघमारे, रवी वाघमारे, सह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.यावेळी ग्रामस्थ, महिला, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पशुसंवर्धन विभागातर्फे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' मोहीम

## पशुपालकांसाठी सुवर्णसंधी: 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' अंतर्गत ३ लाखांपर्यंत अर्थसहाय्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्यातील पशुपालन, शेळी-मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे 'पशुसंवर्धन किसान क्रेडिट कार्ड' (घउउ) मोहीम राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत पशुपालकांना त्यांच्या पशुधनाच्या देखभालीसाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

या योजनेंतर्गत ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १.६० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध करून दिले जाईल. दूध संस्थेने हमी दिल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढवता येते. तसेच, ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडीट कार्ड आहे, त्यांनाही ३ लाखांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेता येईल.

कर्जाचा मूळ व्याजदर ९% असला तरी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून ३% आणि राज्य शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ च्या निर्णयानुसार ४% अशी एकूण ७% पर्यंत व्याज सवलत मिळू शकते. बँकांनाही यात २% व्याज सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या पशुपालक / शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत शून्य टक्के व्याजदराचाही लाभ घेता येऊ शकतो. सन २०२६-२७ पासून 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' (राज्य व जिल्हास्तर) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना या क्रेडिट कार्डद्वारे खेळते भांडवलाचा लाभ घेता येईल. राज्यातील १० लाख पात्र पशुपालकांना या योजनेच्या कक्षेत आणण्याचे उद्दिष्ट पशुसंवर्धन विभागाने ठेवले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयात अथवा १९६२ या हेल्पलाइन नंबरवर संपर्क साधावा.

जे पशुपालक दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद आहेत व ज्यांनी अद्याप या योजनेचा लाभ घेतलेला नाही, असे सर्व शेतकरी या मोहिमेसाठी पात्र आहेत. जिल्ह्याचे 'पशुसंवर्धन उपआयुक्त' या योजनेचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. सद्यस्थितीत पशुपालन करणाऱ्या ज्या पशुपालकांनी या योजनेचा लाभ घेतलेला नाही, अशा पात्र पशुपालकांना या योजनेंतर्गत लाभ घेता येईल.

पात्रता : प्रकल्प धारकाने केंद्र/राज्य शासन/जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अनुदान योजनेचा लाभघेतलेला नसावा. पशुपालन प्रकल्पांमधील सर्व पशुधनाची एनडीएलएम (भारत पशुधन) पोर्टलवर नोंदणी आवश्यक आहे. व्याज परतावा सवलत पुढीलप्रमाणे कमाल पशुधन संख्या असलेल्या पशुपालकांनाच अनुज्ञेय राहिल.

२५,००० मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० किंवा त्यापेक्षा कमी अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, ४५,००० किंवा त्यापेक्षा कमी क्षमतेच्या हॅचरी युनिट, १०० किंवा त्यापेक्षा कमी दुधाळ जनावरांचा गोठा, ५०० किंवा त्यापेक्षा कमी मेंढी / शेळी गोठा, २०० किंवा त्यापेक्षा कमी वराह, पशुपालकांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड कर्ज उचल केलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या आत संपूर्ण कर्ज परतफेड करणे आवश्यक राहील. सदर योजनेच्या निकषाप्रमाणे तसेच, त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या बदलास अनुसरुन आवश्यक त्या बाबींची पूर्तता करणे लाभार्थ्यांस बंधनकारक असेल.

डॉ. किरण पाटील, आयुक्त पशुसंवर्धन

पशुधनाच्या संगोपनासाठी आर्थिक अडचण भासू नये, तसेच ग्रामीण भागात पशुधन व्यवसायाला चालना मिळावी, यासाठी जास्तीत जास्त पात्र पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा.

## हत्तर संग महालिंगेश्वर यात्रा महोत्सव; रक्तदान शिबिरामध्ये ६१ जणांनी केले रक्तदान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग येथील ग्रामदैवत महालिंगेश्वर यात्रा महोत्सव मध्ये रक्तदान शिबिराची आयोजन केले असून या शिबिरामध्ये ६१ जणांनी रक्तदान केले रक्तदान श्रेष्ठदान म्हणून हत्तरसंग कुंडल बरोबर कोर्से गाव आणि परिसरातील नागरिकांनी मिळून सुमारे ६१ जणांनी रक्तदान केले आहे यावेळी महात्मा बसवेश्वर ब्लड बँक सोलापूरचे नागार्जुन जिंकले सुशील दीक्षित नागेश पाटील अश्विनी चौधरी पूजा सूर्यवंशी सुषमा कदम आणि सिद्धेश्वर ब्लड बँक सोलापूर सेंटरची अजय जाधव शिवराज सरवडे आनंद फोंडा भाग्यश्री कांबळे अर्पिता बिराजदार यांची कामगिरी मोलाची ठरली आहे यासाठी श्री महालिंगेश्वर यात्रा महोत्सव कमिटीने पुढाकार घेतला असून रक्तदानाची संकल्पना अतिशय महत्त्वाची आणि गरजेचे असून दरवर्षी राबवली जातो यासाठी गावकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिले याबद्दल यात्रा कमिटीने त्यांचे आभार मानले.